जलसंपदा विभागातील बांधकाम, यांत्रिकी तसेच विद्युत व यांत्रिकी या कार्यप्रकारातील विभागीय कार्यालये बंद करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: आढावा-२०१७/प्र.क्र.२७३/२०१७/आ(प्रशि),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : १० जानेवारी, २०१८.

प्रस्तावना :

पूर्वी मोठ्या प्रमाणात जलसंपदा विभागाची प्रकल्प उभारणीची कामे सुरु होती. दरम्यानच्या कालावधीमध्ये बहुतांश प्रकल्प पूर्णत्वास आल्याने, सिंचन व्यवस्थापन कामासाठी प्रकल्पांचे हस्तांतरण करुन, सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी नवीन सिंचन शाखा कार्यालयांची पदांशिवाय निर्मिती करुन विभागीय/ उपविभागीय व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली आहे. तथापि, वर्तमान परिस्थितीनुरुप व माहिती तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेनुसार संगणकीय आयुधांचा व प्रणालीचा वापर करुन, प्रकल्प उभारणीच्या कार्यालयांची पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने ज्या कार्यालयांतर्गत बांधकाम, विद्युत व यांत्रिकी या कार्यप्रकारातील कामे कार्यरत आहेत, अशा उपविभागीय कार्यालयांचे त्यांच्या विभागीय कार्यालयात विलिनिकरण करण्यात येत आहे. तथापि, ज्या कार्यालयांतर्गत बांधकाम, विद्युत व यांत्रिकी या कार्यप्रकारातील पुरेसा कार्यभार शिल्लक नाही, अशी विभागीय कार्यालये अंतर्गतच्या उपविभागीय कार्यालयांसह बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

बांधकाम, विद्युत व यांत्रिकी या यंत्रणेतील सध्या कार्यरत असलेली परंतु पुरेसा कार्यभार शिल्लक नाही अशी खालील नमूद विभागीय कार्यालये अंतर्गतच्या उपविभागीय कार्यालयांसह बंद करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अधिनस्त मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाक्षेवि, औरंगाबाद अंतर्गतच्या अधीक्षक अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड अंतर्गत बंद करावयाची विभागीय व त्यांतर्गतची उपविभागीय कार्यालये.

अ.क्र.	विभागीय कार्यालयाचे नांव	उपविभागीय कार्यालयाचे नांव
१	उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग, क्र.५, हदगांव.	१) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उपविभाग क्र.१३, हदगांव.
		२) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उपविभाग क्र.२६, हदगांव.
		३) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उपविभाग क्र.२७, हदगांव.
		४) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उपविभाग क्र.३८, ढाणकी.
		५) माजलगांव कालवा उपविभाग क्र.५६, हिमायतनगर.

२. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अधिनस्त मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत बंद करावयाचे कार्यालय

अ.क्र.	कार्यालयाचे नांव
१	प्रादेशिक लघु पाटबंधारे कक्ष, अमरावती.

३. मुख्य अभियंता (विद्युत व यांत्रिकी), जलविद्युत प्रकल्प, मुंबई अधिनस्त बंद करावयाचे कार्यालय.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव
१	निरीक्षण व तपासणी कक्ष, मुंबई.

४. मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक अधिनस्त बंद करावयाची विभागीय व त्यांतर्गतची उपविभागीय कार्यालये.		
अ.क्र.	विभागीय कार्यालयाचे नांव	उपविभागीय कार्यालयाचे नांव
१	नियोजन व संकल्पचित्र विभाग, पुणे.	१) स्थापत्य बांधकाम व यांत्रिकी उपविभाग, पुणे.
		२) संकल्पचित्र उपविभाग, पुणे.
		३) यांत्रिकी इमारत उपविभाग, नाशिक.
		४) गुण नियंत्रण व निरीक्षण उपविभाग क्र.१, पुणे.

५. अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे अधिनस्त बंद करावयाची विभागीय व त्यांतर्गतची उपविभागीय कार्यालये		
अ.क्र.	विभागीय कार्यालयाचे नांव	उपविभागीय कार्यालयाचे नांव
१	सिंधुदुर्ग खारभूमी विकास विभाग, ओरस	१) खारभूमी सर्व्हे व अन्वेषण उपविभाग, तरळे

२. संबंधित महामंडळ कार्यालयांतर्गतच्या बंद होणाऱ्या कार्यालयातील सध्या कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्या समावेशनाची कार्यवाही सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील कार्यालयांमधील रिक्त पदांवर पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रादेशिक तथा महामंडळ कार्यालयाने तात्काळ करावी. तसेच मुख्य अभियंता (यांत्रिकी) व मुख्य अभियंता (विद्युत व यांत्रिकी) या कार्यालयांतर्गतच्या बंद होणाऱ्या कार्यालयातील सध्या कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना संबंधित प्रदेश कार्यालयांच्या नियंत्रणाखालील अन्य कार्यालयांत रिक्त पदांवर पदस्थापना देण्याची कार्यवाही सबंधित मंडळ व मुख्य अभियंता कार्यालयाने पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात तात्काळ करावी.

३. त्याचप्रमाणे कार्यालयांतर्गतचा कार्यभार व कार्यालयीन सर्व अभिलेख (न्यायालयीन, लेखा आक्षेप इतर प्रकरणे) संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख (मुख्य अभियंता) यांचेमार्फत प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने योग्य ठरेल अशा कार्यालयांतर्गत संलग्न करण्यात यावा.

४. उपरोक्त नमूद कार्यालये दिनांक ३१.०१.२०१८ (म.नं.) पासून बंद करण्यासाठी संबंधित कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी आवश्यक सर्व कार्यवाही तात्काळ करावी.

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२ मधील तरतूदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने हा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०११०१३४९३९७५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.01.10 13:54:14 +05'30'

(सु. गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री (खारजमीन) यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा.
७. मा. विधान परिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
८. प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१२. महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१३. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक.
१५. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
१७. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१८. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाक्षेवि, औरंगाबाद.
१९. मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई.
२०. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक.
२१. मुख्य अभियंता (विद्युत व यांत्रिकी), जलविद्युत प्रकल्प, मुंबई.
२२. अधीक्षक अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड.
२३. अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे.
२४. आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. अधीक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
(कार्यालयात झालेल्या बदलाची आवश्यक ती नोंद घेण्यास्तव)
२६. कार्यकारी अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग, क्र.५, हदगांव.
२७. कार्यकारी अभियंता, प्रादेशिक लघु पाटबंधारे कक्ष, अमरावती.
२८. कार्यकारी अभियंता, सिंधुदुर्ग खारभूमी विकास विभाग, ओरस.
२९. कार्यकारी अभियंता, नियोजन व संकल्पचित्र विभाग, पुणे.
३०. कार्यकारी अभियंता, निरीक्षण व तपासणी कक्ष, मुंबई.
३१. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२. आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ.

****